**Q.P. Code :03153**

[**वेळ : २½ तास**] [**गुण : ७५**]

Please check whether you have got the right question paper.

**सूचना :** 1. **सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**
2. **सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.**

**प्र.१ अ** भांषांतर, अनुवाद, रुपांतर व अर्वाचीनीकरण या संकल्पना स्पष्ट करा? १५

**किंवा**

**आ** भाषांतर म्हणजे काय हे सांगून त्याचे सांस्कृतिक संदर्भातील महत्व सविस्तर स्पष्ट करा? १५

**प्र.२** पुढीलपैकी कोणत्याही दोन इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा? १५

**अ.** The wise men of all nations have got together to see if they can find a way of getting rid of war altogether. The first thing that is wanted is co-operation among all the nations. Co-operations is a big word, but it simply means working together. If nations can learn to work together as friends, they will soon find a way of setting their disputes in friendly way. Instead of being jealous of each other and suspicious and proud of their rights, they must learn to be friendly and reasonable and anxious to help each other. And the second thing that wanted is the rule of law. Just as the citizens of a country have laws and agree to obey those laws, so all nations must agree to laws and feel bound to obey and support them. If all nations work together for the common good mankind, and agree to obey the laws then they will never fight each other and there will be no wars.

**आ.** Gandhiji was a devout nationalist. At the same time, he was internationalist par excellence. In a letter to Dr. Julian Huxley he wrote, "The very right to live accrues to us only when we do the duty of citizenship of the world". According to Gandhiji it is not nationalism that is an evil, it is the narrowness, selfishness, exclusiveness which is the bane of modern nations which is an evil. "Indian nationalism wants to organize itself for the benefit and the service of humanity at large," he writes. A country has to be free in order that it may die, if necessary, for the benefit of the world. " My idea of nationalism," observed Gandhiji spiritedly." Is that my country may die so that the human race may live. There is no room for race hatred there".

**इ.** A great part of Arabia is desert. Here there is nothing but sand and rock. The sand is so hot that you cannot walk over it with your bare feet in the daytime. Here and there in the desert are springs of water that come from deep down under that ground-so deep that the sun cannot dry them up. These springs are few and far apart, but wherever there is one, green grass very soon covers the ground all around it. Soon fig trees and palm trees grow tall and graceful making a cool, green, shady place around the spring. Such a place is called oasis.

The Arabs who are not in the cities live in the desert all the year found. They live in tents that can be put up and taken down easily and quickly. So that they can move from one oasis to another, seeking grass and water for their sheep, goats, camels and horses.



पुढील पान

1530F3C4B5E7A8B225F71194F85F4E0B

**Q.P. Code :03153**

**प्र.३** पुढीलपैकी कोणत्याही दोन लीळांचे प्रमाण मराठीत भाषांतर करा. **१५**

**अ.** गोसावियांसि गावी एकी वृक्षखाली आसन : तवं पारधी वाटे ससा सोडीला : तया पाठी सुणीं सोडीलीं : काकुळती येउनि ससा जानूतळि रीगाला: सूणी उभीं राहिलीं : मागिल कडौनि पराधी आले : तेही वीनवींले : ' ससा सोडीजो जी' : सर्वज्ञे म्हणीतलें : 'हा एथ सरण आला' : पुडती तीहीं म्हणीतलें : 'जी जी : हा होडेचा ससा जी : या करणे सुरीया काढणीया होती : जी जी : हा सोडवा जी' : सर्वज्ञे म्हणीतलें : 'हा गां : एथ सरण आलेया काइ मरण असे': 'जी जी : तार गोसावी राखीला' ॥ मग ते निगाले : मग सर्वज्ञें म्हणीतले : ' माहात्मे हो : आतां जाए' : ऐसे भणौनि जानु उचलीली : मग ससा निगाला : ॥

**आ.** भैरवीं अवस्थान : दिस वीस : लोणारीं धारातीर्थी आसन : तेथ कान्हरदेवो आला होता : तेथ गुरुवें सांघीतलें : 'पुरुष एकु भैरवीं असति' : तथा उपरि तयासि धारातीर्थी दर्सन जालें : रायें हडूपातें आसुची वाखारी मागीतली : तीया आसुचा पुंजा दर्सन केला : कान्हरद्या जवळीली म्हणीतलें : ' देवव्हो : घेया : सींगुणाचा कान्हु प्रसन्न जाला': गोसावी भूमि येऊतें पहिलें: तवं रायें म्हणीतलें : 'सरा रे : ऐसें काइ म्हणत असा रे : कान्हु तो तुम्हासी कीं : यांसि काइ कान्हु' : मग तेणें दीठीचें राखण घातले : मग तथोनि गोसावी बीजें केले : तेणें द्रव्ये कुमारेस्वराची पाळी केली : ॥

**इ** एकू वेळ रानीं जाळी एकी बीजें केले होतें : तेथ लाहासिचीं पीलीं होतीं : ते पारधी गेली होती : तीथें पिलीं गोसावी खेळवीलीं : तवं ते आली : गोसावी अवलोकीली : रोखू नीवर्तला : मग ते मोळी टेकौनि बैसली : सूनेयाचिया परी : मग नावेक गोसावी पीली खेळविलीं : वडुवे धरुनि एरी काडीचां एरी कडी घातली : मग तीएचीं तीएकडे घालुनि गोसावी बीजें केलें : ॥

**प्र.४** पुढीलपैकी एका उताऱ्याचे आकलन करून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे ३-५ वाक्यात लिहा **१५**

**अ.** मानवतेच्या युगाच्या निर्मितीसाठी तुमच्या अंगी तारुण्यसुलभ व तारुण्योचित गुण बाणले पाहिजेत. ते गुण म्हणजे तेजस्विता, तपास्विता व तत्परता. हे तारुण्याचे तीन 'त' कर म्हणता येतील.

तेजस्विता म्हणजे वीर वृत्ती. वीर वृत्ती म्हणजे प्रतिकारनिष्ठा. प्रतिकाराचे व्रत घेण्याची वृत्ती. वीर वृत्ती म्हणजे माणसाची माणसाशी लढण्याची वृत्ती नव्हे ; प्रतिकार म्हणजे टक्कर किंवा साठमारी नव्हे. आम्हाला जगातून अज्ञान, अन्याय, दारिद्रय ही नाहीशी करावयाची आहेत. आम्ही अज्ञानाचा प्रतिकार करू, अन्यायाला विरोध करू, दु:खाशी झुंज देऊ हीच तेजस्विता. अज्ञान, अन्याय व दु:खाचा नाश करण्याकरिता माणसांचा नाश करणे म्हणजे समाजाच्या मुळावरच घाव घालणे होय. जगात सगळीकडे संपन्नता व समृद्धीचे साम्राज्य झाले, पण सुबत्तेचा गुण्यागोविंदाने फायदा घेणारी माणसेच नसतील तर त्या सगळ्या संपत्तीची यादवीमुळे राखरांगोळी होईल म्हणून तेजस्विता किवा वीर वृत्ती म्हणजे माणसांचे रक्षण करून त्याला जडलेल्या व्याधींचा प्रतिकार करण्याची वृत्ती हेच तेज.



पुढील पान

1530F3C4B5E7A8B225F71194F85F4E0B

**Q.P. Code :03153**

तपावाचून तेज उत्पन्न होणे शक्य नाही. तप हे दोन प्रकारचे असते. एक, कष्ट सहन करण्याचा सराव करणे आणि त्याकरिता मुद्दाम संकटात जीव घालणे. या धाडसी वृत्तीला तपाचरण म्हणतात. यात कष्ट सहन करण्याचा अभ्यास करावयाचा असतो. तपाचा दुसरा प्रकार म्हणजे तितिक्षा. तितिक्षा म्हणजे येऊन पडलेल्या हालअपेष्टा सोसण्याची तयारी. तपाच्या अभ्यासात ही शक्ती अंगी येते. अशा दुहेरी तपाने प्रतिकारनिष्ठा जागृत होते.

तेज व ताप यांच्या जोडीला तत्परताही हवी. तत्परता म्हणजे पत्करलेल्या कार्याशी तदाकार होण्याची वृत्ती. घेतलेल्या कामात गढून जाण्याची आणि त्यासाठी इतर कामे बाजूस सारून नेहमी तयार असण्याची सवय असली पाहिजे. कुठलीही सवय किंवा अडचण अंगीकृत कार्याच्या आड येता कामा नये. ज्यांची वृत्ती कार्याशी तद्रूप झालेली आहेत, त्यांना स्वत:चा संसार सुचत नाही. विषयसुखाची चाड वाटत नाही. जुन्या मराठ्यांबद्दल असे म्हणतात की, तलवार हीच त्यांची अर्धांगी असे. ज्याने प्रतिकाराचे व्रत घेतले आहे. त्याच्या निष्ठेचे हे स्वरूप आहे. हि निष्ठा तुम्हाला प्रत्येक क्रांतीविराच्या चारित्र्यात आढळेल.

या गुणांचा विकास करण्याचे शिक्षण जेव्हा देण्यात येईल, तेव्हा आपले सामाजिक जीवन धन्य होऊल. सगळ्या दुनियेचा संसार हा त्या दिवशी सोन्याचा होईल. एकमेकांना सुखी पाहण्यात माणसाला धन्यता वाटेल. आजही आपण एखादे सुंदर दृश्य पाहिले किंवा स्वादिष्ट फळ खाल्ले, तर त्या आनंदात आपल्या प्रेमाच्या माणसाला सामील केल्याखरीज आपल्याला चैन पडत नाही. सुखात दुस-याला वाटेकरी केल्याने सुख वाढते, ही व्यापक जाणीव ज्याला आहे तो माणूस. जो एकटा भोगतो तो चोर.

१. तारुण्याचे तीन 'त' कार कोणते आहेत?

२. तेजस्विता म्हणजे काय?

३. तापाचे दोन प्रकार कोणते?

४. तत्परता म्हणजे काय?

५. माणसाजवळ कोणती व्यापक जाणीव हवी?

**आ.** समाज ही एक रचना व व्यवस्था असते. एका अंगाने पाहिल्यास व्यक्तीमधील संबंधाची विशिष्ट ठेवणीची वीण म्हणजे समाज अशी ही व्याख्या करता येईल. समाजाची धारणा ही गुंतागुंतीची गोष्ट आहे. ती केवळ हौसमौजेची गोष्ट नसते. तीत केवळ व्यक्तींच्या इच्छेअनिच्छेवर सोडून देता येईल अशी गोष्ट नसते. समाजाची धारणा व्हावयाची तर अनेकाअनेक भूमिका बऱ्यापैकी निटपणे व अपेक्षेप्रमाणे, रीतिनुसार पार पाडल्या जाणे आवश्यक असते. कर्तव्याची पूर्तता करावी लागते. जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. पेलत नसला तरी भार उचलावा लागतो वगैरे. जगण्याच्या भूमिका पार पडण्याच्या ओघात जुळू येणारे संबंध आणि नाती ही सर्वच व नेहमी सुख, समाधान, शांती यांचा अनुभव देणारी असत नाहीत. ती मन:स्ताप निर्माण करणारी, शरीर, मन यांच्यावर ताण उत्पत्र करणारी असतात.

संबंध/नाती यांचे जाळे ही माणसांची स्वाभाविक स्थिती असते. संबंधांमधून माणसाला माणूसपण प्राप्त होत असेल तरी संबंध जोपासत जगणेही काहीवेळा तारेवरची कसरतही असते. व सुळावरची पोळी असते. थोडक्यात,



पुढील पान

1530F3C4B5E7A8B225F71194F85F4E0B

एका ना एका समाजात माणूसपण प्राप्त होते ते सामन्यात: कष्ट साध्यच असते. असेलच तर काही विरळ अपवाद वगळता, प्रत्येक व्यक्तीच्या ही गोष्ट अनुभवाची असल्याने ही गोष्ट पटवून देत बसण्याची गरज नाही.

संबंध/नाती यांचे आपण स्थूलमानाने दुहेरी वर्गीकरण करू शकतो. काही संबंध असे असतात की जे निभावून नेताना शक्ती खर्ची पडते, तर काही संबंध असे असतात की जे माणसाला बळ देतात. अनेक संबंध असे असतात की ज्यांना ही दोन्ही अंगे असतात.

अशी क्वचितच माणसे असतील ज्यांना कोणत्याच दुस-या माणसाचा आधार लागत नाही. वा नात्यांमधून मिळणा-या बळाचीही गरज नसते. जे सर्व प्रकारचे शक्तीक्षय घडवून आणणारे संबंध केवळ आंतरिक बळावर पेलतात. ज्यांच्या अंतर्यामी उर्जेचा असा एक अखंड झरा असतो जो पुरून उरतो. भगवान गौतम बुद्धांसारखी अगदी विरळ का होईना, पण अशी माणसे असतात हे मात्र ध्यानात ठेवावयास हवे.

१. समाज म्हणजे काय?
२. नाती कशी असतात?
३. माणसासाठी तारेवरची कसरत कोणती असते?
४. नाते - संबंधाची विशेषता काय आहे?
५. या उताऱ्यात गौतम बुद्धांचे उदाहरण का दिले आहे?

**प्र.५ अ.** पुढीलपैकी कोणतेही दोन लघुत्तरी प्रश्न सोडवा. **१०**

१. भाषांतरकर्त्याच्या क्षमता स्पष्ट करा.
२. भाषांतरात शैली हा घटक कोणती महत्वपूर्ण भूमिका पार पाडतो ते थोडक्यात लिहा.
३. पुढील उताऱ्याचे आकलन करून तुमच्या शब्दात सारांश लिहा

सध्याचा मनू असा आहे की, हा समानत्वाचा घोष ज्याच्या त्याच्या तोंडी चालू राहावा. असे झाल्यामुळे अनेक बिकट प्रश्न उत्पन्न होत आहेत. मागासलेले असणे, दुबळे असणे, कर्तृत्वशून्य असणे हा हक्क बनू पाहत आहे. आपल्या अंगातील सामर्थ्याची वाढ करून घेण्याला संधी पाहिजे, हा घोष तारतम्याने न्याय्य ठरतो, पण आपण कसेही असलो तरी समत्वाच्या मुद्द्यावर इतरांच्या बरोबरीने जीवितातील सुखसोयी व अधिकार आपल्याला लाभले पाहिजेत, असा हक्क जगातील लोक सांगू लागले आहेत. म्हणजे कर्तुत्व एकाचे शहाणपण, क्लृप्ती, प्रतिभा ही एकाची आणि ज्याच्या अंगी या गोष्टींचा मागमूसही उत्पन्न व्हावयास अजून बराच अवधी आहे तो या सामर्थ्याच्या कर्तृत्वातून निष्पन्न होणारे सर्व लाभ आणि भोग त्याच्या बरोबरीने भोगू इच्छितो. समत्वाचा हा अर्थ जगात रूढ होऊ पाहत आहे आणि त्यातूनच जगात अनेक वाद सध्या चालू होत आहेत.

**Q.P. Code :03153**

४. पुढील उताऱ्याचे आकलन करून सारांश तुमच्या शब्दात लिहा.

जास्त गोड पदार्थ खाणे, खूप जेवणे, कुठलेही पेय जास्त प्रमाणावर घेणे, धुम्रपान करणे यांसारख्या वाईट सवयी लावून घेणे फार सोपे आहे. एखादी गोष्ट जितकी जास्त वेळा करू तितकी ती करायला आपल्याला आवडू लागते. जर आपण ती करणे सोडून दिले तर आपण दु:खी होतो. यालाच सवयीचे दडपण म्हणतात. अशा सवयीच्या दडपणाचा प्रतिकार करायला पाहिजे.

ज्या गोष्टी प्रसंगपरत्वे केल्या असता चांगल्या ठरू शकतात, त्याच जर वारंवार आणि जास्त प्रमाणात केल्या तर अपायकारक ठरण्याची शक्यता असते. काम अथवा विश्रांती यांसारख्या चांगल्या कृतीनाही हे लागू पडते. काही लोक अतिरेकी काम करायची तर काहीजण रिकाम पणात वेळ घालवण्याची वाईट सवय लावून घेतात. शहाण्या माणसाला, आपण फार आळशी बनत चाललो आहोत, किंवा 'आपल्याला गोड पदार्थ फार आवडतात ' किंवा 'आपण फारच धूम्रपान करतो आहेत' अश्या गोष्टी आपल्या बाबतीत ख-या ठरत आहेत याचे नेहमी स्मरण असते आणि त्यावर तो लगेच' आता या सवयी जडल्या तर त्यातून आपण लवकर बाहेर पडू अशी पुस्तीही जोडतो.

**प्र.५ ब.** पुढील पारिभाषिक इंग्रजी शब्दाच्या मराठी प्रतीशब्दांशी जोड्या जुळवा. **०५**

| | |
|---|---|
| १. Advanced studies | -१. अधिवास |
| २. Bond | -२. संपादक |
| ३. Committee | -३. प्रगत पाठ्यक्रम |
| ४. Domicile | -४. बंधपत्र |
| ५. Editor | -५. समिती |

---------------------------



1530F3C4B5E7A8B225F71194F85F4E0B